| MHYA050063322026 | इ.कि.फौ.मा.क्र. ३८/२०२६<br>रमेश दादाराव पवार —वि— शासन |
|---|---|

:: **आदेश नि. क्र. १ खाली** ::

**१.** अर्जदार रमेश दादाराव पवार यांनी सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये बजाज डीस्कव्हर १०० सी.सी. दुचाकी क्रमांक एम. एच. २९ — ए.जी. ९६८१ हे वाहन गुन्हा क्र. ९०/२०२६ हा शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ आणि बी.एन.एस. चे कलम ३(५) अनुसार जप्त असलेले वाहन राज्य पोलिस स्टेशन वसंतनगर ता. पुसद जि. यवतमाळ यांचेकडुन परत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता श्री. के.ए.मुळे यांनी अर्जदारास सदर वाहन सुप्रतनाम्यावर अटीशर्तीसह देण्याबाबत म्हणणे निशाणी क्र. १ व तपासी अधिकारी यांनी म्हणणे नि. क्र. ५ व आरोपी वरूण गजानन इंगोले यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ६ वर सादर केलेले आहे.

**२.** अर्जदारातर्फे विद्वान अधिवक्ता श्री. एस.बी. गावंडे व सरकारतर्फे श्री. के.ए.मुळे यांचा युक्तीवाद ऐकला व दस्ताऐवज पाहिले. माझ्या मते, सदर प्रकरणात बजाज डीस्कव्हर १०० सी.सी. दुचाकी क्रमांक एम. एच.२९ — ए.जी. ९६८१ हे वाहन गुन्हा क्र. ९०/२०२६ हा शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ आणि बी.एन.एस. चे कलम ३(५) अनुसार जप्त असलेले वाहन राज्य पोलिस स्टेशन वसंतनगर ता. पुसद जि. यवतमाळ यांनी जप्त केल्याचे दिसुन येते. त्याबाबत प्रथम खबर अहवाल आर्टिकल अ वरून दिसुन येते. सदरचे वाहन दिनांक २७.०२.२०२६ तारखेस जप्त केले याबाबत तपासी अधिकारी यांचे म्हणणे निशाणी क्र. ५ मध्ये उल्लेख देखील उल्लेख आहे.

**३.** माझ्या मते, प्रस्तुत प्रकरणात अर्जदार आरोपी नाही. सदरची दुचाकी आरोपी वरूण गजानन इंगोले यांच्याकडुन जप्त केल्याचे दिसुन येते. अर्जदार हा वाहनाचा मालक असल्याबाबत वाहनाचे तपशील निशाणी क्र. ०८ वर दाखल केलेला आहे.

**४.** वरील कागदपत्रांवरून अर्जदाराची मालकी व ताबा सिद्ध होतो. सदरचे वाहन हे नियमितपणे व्यापारसाठी वापरत असल्याचे दिसून येते. सदरचे राज्य उत्पादन शुल्क, पुसद येथे बंदस्थितीत उभा राहिल्यास त्याचे भाग जुने व कमकुवत होतील. तसेच वाहनाची बाजार किंमत कमी होईल. त्यामुळे अर्जदाराचे व्यावसायीक व आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकरता येत नाही. म्हणुन सदरचे वाहन योग्य त्या अटी शर्तीवर सोडणे योग्य होईल. म्हणून न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## :: <u>आदेश</u> ::

| | |
|---|---|
| १) | अर्ज खालील अटींवर मंजूर करण्यात येतो. |
| २) | अर्जदाराने **रु. १,००,०००/— ( रुपये एक लाख रूपये फकत )** चे बंधपत्र दिल्यानंतर **बजाज डीस्कव्हर १०० सी.सी. दुचाकी क्रमांक एम. एच.२९ — ए.जी. ९६८१** हे वाहन अर्जदारास सुपुर्तनाम्यावर परत करण्यात यावे. |
| ३) | अर्जदाराने प्रकरण संपेपर्यंत सदरच्या वाहनाचे हस्तांतरण, विक्री, अथवा कोणाचाही स्वाधीन किंवा वाहनाच्या स्थितीत बदल करु नये. अर्जदाराने वाहनाचा कोणत्याही प्रकारे गैरवापर करु नये. |
| ४) | निरीक्षक, पोलिस स्टेशन वसंतनगर, पुसद यांना आदेशीत करण्यात येते की, सदर वाहन अर्जदारास सोपविण्यापूर्वी त्यांनी सदर वाहनाचे रंगीत छायाचित्र व सविस्तर पंचनामा करावा व सदर पंचनामा दुय्यम पुरावा म्हणुन वापरण्यात येईल. |
| ५) | अर्जदाराला जेव्हा केव्हा न्यायालय, तपासी अधिकारी आदेश देतील तेव्हा सदरचे वाहन हे आदेशाप्रमाणे तपासासाठी हजर ठेवावे. |
| ६) | पोलिस स्टेशन वसंतनगर, पुसद यांना आदेश कळवावा. हमदस्त मंजुर. |

स्वा/-

दिनांक : २६/०५/२०२६

**( श्रीमती व्ही.डी.बिरहारी )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पुसद.